## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

वादीने निशाणी ५ वरील अर्ज हा प्रतिवादींविरुध्द मुळ दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकतीवरील त्यांच्या मालकी कब्जाला अडथळा, हस्तक्षेप स्वतः किंवा त्यांच्या नोकर–चाकर व इतर हस्तकामार्फत करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या कथनाप्रमाणे, वादीचे वडील रामलिंग भातांगळे हे दि.०९.१२.२०१८ रोजी मयत पावले असून त्यांना वादी, वनमाला व प्रदीप असे वारस आहेत. वादी हा कर्ता पुरुष असल्यामुळे वादीने सदरचा दावा हा इतर वारसांच्या वतीने दाखल केलेला आहे. मयत रामलिंग भातांगळे यांना गट क्र.१६५ मौजे सांगवी ता.रेणापूर जि.लातूर मध्ये १ हेक्टर २९ आर जमीन होती. यापुढे सदर मिळकतीला 'दावा मिळकत' असे संबोधले जाईल.

०३. दि.१४.०५.१९८१ रोजीच्या खरेदीखत क्र.२३८४ अन्वये मयत रामलिंग भातांगळे हे दावा मिळकतीचे मालक झाले होते. मयत रामलिंग यांच्या निधनानंतर दावा मिळकतीला लागून आहे. दावा मिळकतीतून येणारे उत्पन्न हेच वादीचे उत्पन्नाचे साधन आहे.

०४. दि.१५.०५.२०२३ रोजी प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्याला अडथळा निर्माण केला. त्यामुळे दि.०२.०२.२०२४ रोजी वादीने दावा मिळकतीची मोजणी केली, त्यावेळी वादीच्या ताब्यामध्ये संपूर्ण दावा मिळकत नसल्याचे निदर्शनास आले. तसेच प्रतिवादीच्या ताब्यामध्ये अतिरीक्त ५३ आर असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वादीच्या ५३ आर मिळकतीवर अतिक्रमण केलेले आहे.

त्यामुळे वादीने प्रतिवादींना त्याच दिवशी ५३ आर क्षेत्राचा कब्जा देण्याची विनंती केली. परंतु प्रतिवादींनी त्यास टाळाटाळ केली.

०५. दि.१९.०३.२०२४ रोजी वादीने प्रतिवादींकडे अतिरीक्त क्षेत्राची मागणी केली असता त्यास त्यांनी नकार दिला. तसेच वादीने प्रतिवादींना दावा मिळकतीवरील त्यांच्या कब्जाला अडथळा निर्माण करु नये अशी विनंती केली असता प्रतिवादींनी वादीला व त्याच्या आईला गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली.

०६. त्यानंतर वादी हा मोजणी अधिकारी रेणापूर यांच्याकडे गट क्र.१६५ ची मोजणी करण्यासाठी गेला असता ७/१२ उताऱ्यावरील इतर सहधारकांची संमती असल्याशिवाय मोजणी करता येणार नाही व त्याला न्यायालयाची परवानगी लागेल असे सांगितले. प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जाला अडथळा निर्माण करत आहेत. तसेच प्रतिवादींनी दावा मिळकतीवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे प्रतिवादींना प्रतिबंध केला नाही तर वादींना दावा मिळकतीचा उपभोग घेता येणार नाही. तसेच न्यायालयात दाखल करण्यात येणाऱ्या दाव्याची संख्या वाढू शकते. त्यामुळे वादीने प्रतिवादींविरुध्द सदर दावा मिळकतीच्या कब्जाला अडथळा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाईहुकूम आदेश पारीत करण्याची विनंती केली.

०७. प्रतिवादी क्र.१ ते ७ व ९ हे न्यायालयात हजर झाले परंतु त्यांनी त्यांची पटलावर कैफियत आणि सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द सदर अर्ज विनाकैफियत व विना म्हणणे चालविण्यात येत आहे. तसेच प्रतिवादी क्र.८ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले नसल्यामुळे नि.१ वरील आदेशान्वये प्रकरण त्याचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

०८. वरील कथनावरुन अर्जाचे निर्णयाकामी माझ्या समोर खालील मुद्ये प्रस्थापित होतात, त्या मुद्यांचे निष्कर्ष मी कारणमीमांसासह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस दिसुन येते काय? | : | नाही.. |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | : | नाही.. |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर केल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होणार काय ? | : | प्रतिवादींचे |
| ४. | आदेश काय ? | : | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

०९. वादीने निशाणी ०४ सोबत खरेदीखत क्र.२३८४ ची प्रत, गट क्र.१६५ च्या ७/१२ उताऱ्याची प्रत, ८/अ उताऱ्याची प्रत, गट क्र.१६४ च्या ७/१२ उताऱ्याची प्रत, कुटूंबाचे प्रमाणपत्राची प्रत इत्यादी कागदपत्र अभिलेखावर दाखल केले आहेत. याउलट प्रतिवादी यांनी कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेली नाहीत. अर्ज व अभिलेखावरील दाखल कागदपत्राचे अवलोकन केले.

१०. वादीच्या विधीज्ञांनी अर्ज व पटलावर दाखल कागदपत्रान्वये युक्तिवाद केला. प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर असल्यामुळे सदरचा अर्ज विनायुक्तिवाद चालविण्यात येतो.

### मुद्दे क्र. १ ते ४ करीता –

११. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने, पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांची चर्चा एकत्रीतपणे करण्यात येते. सदरचा अर्ज मंजुर करण्यासाठी वादींना त्यांच्या बाजुने प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तराजु व कधी न भरुन येणार नुकसान होउ शकेल या

बाबी प्रथमदर्शनी सिध्द करणे गरजेचे आहे.  वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमीत क्षेत्र ५३ आर चा ताबा मिळण्यासाठी, प्रतिवादींनी ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले असे जाहीर होऊन मिळण्यासाठी व निरंतर मनाईहुकूमासाठी दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे हे वादीला त्याने मोजणी केल्यानंतर समजले. वादीने सदरच्या दाव्यासोबत प्रतिवादींनी कोणत्या दिशेने किती अतिक्रमण केले आहे हे दाखविण्यासाठी कोणताही नकाशा दाखल केलेला नाही.

१२.        वादीच्या वादपत्राचे व पटलावर दाखल केलेल्या खरेदीखताच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकतीच्या पश्चिम व दक्षिणेला प्रतिवादींची मिळकत आहे. तसेच गट क्र.१६४ व १६४ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांची मिळकत एकाच गटात व लगत असल्याचे स्पष्ट होते. तसेच खरेदीखतावरुन वादपत्रावरुन मयत रामलिंग यांच्या निधनानंतर वादी व इतर वारस आहेत हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

१३.        वादीने सदरच्या दाव्यासोबत वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादींनी कोणत्या दिशेने किती अतिक्रमण केले आहे याचा नकाशा दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये दाखल केलेला नाही. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे वादीने मोजणी केल्यानंतर प्रतिवादीने ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे त्याला समजले. परंतु वादीने सदर नकाशाची प्रतसुध्दा पटलावर दाखल केली नाही. प्रतिवादी हे न्यायालयासमक्ष हजर झाले नाहीत व त्यांनी त्यांची कैफियत जबाब दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी वादीचे कथन नाकारले नाही, त्यामुळे केवळ वादीच्या अर्जावर व शपथपत्रावर अवलंबून प्रतिवादींनी ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे असे म्हणता येणार नाही.

१४.        तसेच वादीने प्रतिवादींविरुध्द प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीतील वादीच्या कब्जास अडथळा निर्माण करु नये असा तात्परता

मनाईहुकूम आदेश पारीत करण्याची विनंती केली. परंतु वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. म्हणजेच आजरोजी दावा मिळकतीवरील ५३ आर क्षेत्रावर वादीचा कब्जा नाही. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीवरील त्यांच्या शांततामय कब्जाला अडथळा निर्माण करीत आहेत. वादीने प्रथमदर्शनी प्रतिवादी यांनी ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे हे सिध्द केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीच्या कब्जाला अडथळा करत आहेत हे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने दिसून येत नाही.

१५. वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली नाही. तसेच प्रतिवादी वादीच्या शांततामय कब्जाला अडथळा निर्माण करीत आहेत हे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. केवळ वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी दावा मिळकतीतील ५३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. परंतु प्रथमदर्शनी सदरचे अतिक्रमण शाबीत झालेले नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज नामंजूर केल्यास कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाचा समातोल तराजुसुध्दा वादीच्या बाजूने दिसून येत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>–: आ दे श :–</u>**

| | |
|---|---|
| १) | वादीचा निशाणी क्र.५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| २) | खर्चाबाबत आदेश नाही. |

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.04.11 16:13:56 +0530

रेणापूर.
( डि.एम.गित्ते)

दिनांक : ११/०४/२०२६
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रेणापूर